## दिन विशेष...
१७४२ : पेशवाईतील थोर मुत्सद्दी नाना फडणवीस यांचा जन्म झाला.
१७९४ : मराठेशाहीतील एक भक्कम बुरुज महादाजी शिंदे यांचे निधन झाले.
१८०९ : चार्लस रॉबर्ट डार्विन यांचा जन्म झाला.
१९२८ : सरदार वल्लभभाई पटेल यांनी बार्डोलीच्या सत्याग्रहाचा प्रारंभ केला.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८४,२३३.६४ +४०.२८ (०.०४८%)
डॉलर ₹ ९०.७६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३४ | १७ |
| दिल्ली | २५ | १२ |
| मुंबई | ३५ | २१ |
| नागपूर | ३१ | १६ |
| पुणे | ३३ | १२ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९४ किंमत : ५ रु. | पाने ४

### सुविचार
आत्मविश्वास हा यशाचा मूलमंत्र आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, तुमचे स्वप्न साकार होतील.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-७:०० संध्या-६:२४

### सोने – चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५८,५१०/- २,९०,०००/-

### केळी भाव
नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### कामगार संघटनांची आज भारत बंदची हाक
**नवी दिल्ली ।** केंद्र सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलाला देशभरातून तीव्र विरोध केला जात आहे. या कामगार कायद्यांविरोधात देशभरातील दहा कामगार संघटनांनी गुरुवार दि.१२ फेब्रुवारी रोजी भारत बंदची हाक दिली आहे. शेतकऱ्यांच्या विविध संघटनांनीही या भारत बंदला पाठिंबा दिला असून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनेही उद्याच्या भारत बंदला पाठिंबा दिलेला आहे.

### बीसीसीआय आपल्या भूमिकेवर ठाम
**मुंबई ।** संघ व्यवस्थापनाने खेळाडूंच्या पत्नी आणि मुलांना सोबत प्रवासाची परवानगी मागितली होती. त्यावर बीसीसीआयने स्पष्ट केले की, कुटुंबीय खेळाडूंसोबत एकाच हॉटेलमध्ये किंवा प्रवासात राहणार नाहीत. मात्र, जर कुटुंबियांना सामना पाहायला यायचे असेल, तर त्यांच्यासाठी वेगळी राहण्याची सोय करण्याचा पर्याय बोर्डाने उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे नो फॅमिली, ओन्ली क्रिकेट! बीसीसीआय या आपल्या भूमिकेवर ठाम आहे.

# भारत टिकला तरच जग टिकेल
## माळसाने येथील महोत्सवातून डॉ.मोहन भागवत यांनी दिला इशारा

वृत्तसंस्था । मालेगाव

**मानवी जीवन आणि सृष्टीचे चक्र सतत सुरू राहावे, यासाठी अहिंसा,अनेकांतवाद व अपरिग्रह या त्रिसूत्रीचा मार्ग सांगितला गेला आहे. हा मार्ग सांगणाऱ्या आणि त्याचे अनुकरण करणाऱ्या महापुरुषांची भारतात मोठी परंपरा आहे. त्याचा आपल्याला खूप लाभ होत आहे. याच आधारावर भारतवर्ष टिकून राहील आणि भारत टिकला तरच जग टिकेल,असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले आहे.**



माळसाने (ता.चांदवड) येथील णमोकार तीर्थ येथे आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक आणि महामस्तकाभिषेक महोत्सव सुरू आहे. जैन धर्मियांचा कुंभमेळा समजल्या जाणाऱ्या या महोत्सवात मंगळवारी भागवत हे सहभागी झाले. यावेळी बोलताना त्यांनी संपूर्ण जगाला सुखाचा मार्ग दाखवण्याची वेळ आता आली आहे.

कारण धर्माचा समतोल आणि शिस्त सोडून जगाने भौतिक विकासाची जी वाट धरली, त्यावर जग २००० वर्षे चालले; मात्र त्याचे अपेक्षित परिणाम मिळाले नाहीत. सोयी–सुविधा खूप मिळाल्या, पण सुख मात्र लांब गेले आहे. अशा स्थितीत आधुनिक ज्ञान व प्राचीन ज्ञान यांची सांगड घालून धर्म अनुशासनानुसार लोकांनी पुढे जावे आणि सृष्टीला पुढे न्यावे,असा आग्रह भागवत यांनी धरला.

भारतात पंथ, संप्रदायांसह अनेक बाबतीत विविधता आहे आणि ती स्वीकारण्याची भारताची मनोवृत्ती राहिली आहे. प्रत्येकाची स्वतःची पद्धत आहे, स्वतःचे विचार दर्शन आहे आणि स्वतःचा मार्ग आहे. माझा मार्ग माझ्यासाठी योग्य आहे आणि त्यांचा त्यांच्यासाठी योग्य आहे हे तत्व स्वीकारले जाते. धर्म आचरण करणाऱ्या समाजामुळे विविधतेतून एकता निर्माण झाली,असेही भागवत यांनी नमूद केले. याप्रसंगी गणाचार्य कुंथूसागर महाराज, आचार्य देवनंदनजी महाराज,आमदार डॉ. राहुल आहेर, चांदवडचे उपनगराध्यक्ष भूषण कासलीवाल, संयोजन समितीचे अध्यक्ष राहुल भंडारी (पान २ वर)

**● धर्म आचरण सोडणे हे समस्यांचे मूळ...**
धर्माचे आचरण सोडल्यामुळे आज मानवी जीवनात वेगवेगळ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. परंतु भारताचे हे भाग्य आहे की, प्राचीन काळापासून आपल्या हृदयात धर्माचा अवलंब करण्याची बुद्धी जागृत ठेवणाऱ्या महापुरुषांची परंपरा आपल्याला लाभली आहे. हे भाग्य आजही लाभत आहे आणि भविष्यातही मिळत राहील, असा विश्वास भागवत यांनी व्यक्त केला.

# पाळधी येथे भीषण अपघात; एकाचा जागीच मृत्यू
## ● तिघे गंभीर; संतप्त ग्रामस्थांचा रास्तारोको



प्रतिनिधी । जामनेर

**तालुक्यातील जळगाव ते संभाजीनगर महामार्गावर पाळधी गावाजवळ आज झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. तर तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी रास्तारोको आंदोलन सुरू केल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.**

पाळधी हे गाव थेट महामार्गालगत असल्यामुळे येथे नेहमीच भरधाव वाहने धावत असतात. आज बुधवार दि. दुपारी झालेल्या अपघातात एका वाहनाने अचानक नियंत्रण गमावल्याने भीषण धडक बसली. या धडकेत एकाचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तिघेजण गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघातानंतर परिसरात मोठी गर्दी झाली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या भागात वारंवार लहान–मोठे अपघात (पान २ वर)

## राहुल गांधींचा लोकसभेत मोदी सरकारवर हल्लाबोल
# देश विकताना तुम्हाला लाज वाटली नाही का?

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन पहिल्या दिवसापासूनच गोंधळ आणि खडाजंगीने गाजत असल्याचं पाहायला मिळत आहे. भारतावरील टॅरिफबाबत अमेरिकेची भूमिका आक्रमक होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पीय अधिवेशनात सत्ताधारी व विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी होत असल्याचं दिसत आहे. त्यातच, विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी लोकसभेत माजी लष्करप्रमुख मनोज नरवणेंच्या पुस्तकाचा उल्लेख केल्यामुळे त्यावरूनही लोकसभेत मोठा गदारोळ झाला. या पार्श्वभूमीवर आज लोकसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान राहुल गांधींनी आपल्या भाषणात भारत–अमेरिका कराराचा मुद्दा उपस्थित करताच लोकसभेत गोंधळाचं वातावरण निर्माण झालं.**



राहुल गांधींनी आपल्या भाषणात वारंवार अदाणी, अंबानी व अमेरिकेतील एपस्टाईन फाईल्सच्या खटल्याचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर सत्ताधारी बाकांवरून संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू, प्रल्हाद जोशी यांनी तीव्र आक्षेप घेतला. यावेळी लोकसभा अध्यक्षांच्या खुर्चीवर बसलेले तालिका अध्यक्ष जगदंबिका पाल यांनीदेखील राहुल गांधींना वारंवार थांबवत याबाबत समज दिली. यानंतर राहुल गांधींनी आपल्या भाषणात भारत व अमेरिका यांच्यादरम्यान झालेल्या करारावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर परखड (पान २ वर)

# जळगावसाठी वाढीव ३०० कोटी रुपयांचा निधी द्या
## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

वृत्तसंस्था । जळगाव

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत २०२६–२७ चा प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात राज्यस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगाव जिल्ह्यासाठी डीपीडीसी अंतर्गत किमान ३०० कोटी रुपयांचा वाढीव निधी देण्याची मागणी केली.**




पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगाव जिल्हा गेल्या चार वर्षांपासून जिल्हा वार्षिक योजनेच्या (डीपीडीसी) खर्चात राज्यात प्रथम क्रमांकावर असल्याचे नमूद करत, मुख्यमंत्री १५० दिवस सुधारणा कार्यक्रम आणि १०० दिवसांच्या मूल्यमापनातही जिल्ह्याने अव्वल कामगिरी केल्याचे सांगितले. तसेच राज्य दरडोई सरासरीनुसार जिल्ह्यास जादा निधी मिळणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी सादरीकरणात सांगितले की, २०२६–२७ साठी जळगाव जिल्ह्यास शासनाकडून ५९६.४२ कोटी रुपयांची निधी मर्यादा कळविण्यात आली आहे. मात्र, जिल्ह्यातील विविध कार्यान्वयीन यंत्रणांकडून १५०२.९० कोटी रुपयांच्या मागण्या प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे सुमारे ९०६.४८ कोटी रुपये अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. चालू आर्थिक वर्षात राबविण्यात आलेले विशेष प्रकल्प तसेच जिल्हा विकास आराखड्यानुसार प्रस्तावित योजनांची माहिती सुद्धा त्यांनी दिली.

पालकमंत्री पाटील यांनी वाढीव निधीतून महानगरपालिका व नगर परिषदांमधील पायाभूत सुविधा, जिल्हा परिषद शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळा, वर्गखोल्या व क्रीडांगणे, कायदा व सुव्यवस्था बळकट (पान २ वर)

# बीडमध्ये पोलीस भरतीदरम्यान तरुणाचा मृत्यू

वृत्तसंस्था । छ. संभाजीनगर

**बीड येथे सुरू असलेल्या पोलीस भरतीच्या प्रक्रियेमध्ये एका तरुणाचा बुधवारी दुपारी मृत्यू झाला. दीपक वाव्हुळ, असे मृत तरुणाचे नाव असून, तो परळी येथील रहिवासी असल्याची माहिती बीड पोलीस अधीक्षक कार्यालयातील सूत्रांकडून मिळाली. दीपक परळीहून पोलीस भरतीसाठी बीड येथे सकाळी दाखल झाला.**






कवायत, धावणे आदी प्रकारानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. डीहायड्रेशनचा त्रास होत असल्याचे तपासणीदरम्यान सांगण्यात आले. मात्र त्यानंतर काही वेळातच दीपकचा मृत्यू झाल्याचे समोर आले.

पोलीस यंत्रणेने तातडीने दीपकला जिल्हा रुग्णालयात दाखल केले. दीपकचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हृदयविकाराचा तीव्र धक्का त्याला बसला की अन्य काही कारण आहे, याची स्पष्टता शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर होईल, असे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले.

मृत दीपक वाहुळ हा परळीजवळच्या मांडेखेल गावचा रहिवासी आहे. त्याचे आई–वडील ऊसतोड कामगार आहेत. त्याला आणखी एक दुसरा लहान भाऊ असून, तो ऑटोरिक्षा चालवतो. घरातील हालाखीच्या परिस्थितीमुळे दीपक काही दिवस पुण्याला काम करण्यासाठी गेला होता. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून दीपकने गावाकडे येऊन पोलीस भरतीची तयारी केली होती, अशी माहिती काही निकटवर्तीयांकडून मिळाली. दीपकच्या मृत्यूवर बीड पोलीस मुख्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार दीपकने दुपारी १२.५५ च्या सुमारास मैदानावरील १६०० मीटर धावण्याचे अंतर पूर्ण केले होते. मैदानावर लावलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये सर्व घटनाक्रम नोंद झाला आहे. दीपक धावल्यानंतर वैद्यकीय खोलीमध्ये स्वतः चालत जाताना दिसून आला. तेथे त्याच्यावर प्राथमिक (पान २ वर)

# राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ रोजी सुरुवात

वृत्तसंस्था । मुंबई

नुकताच केंद्राने देशाचा वार्षिक अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आता महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प ६ मार्च रोजी सादर केला जाणार असून, हे अधिवेशन २५ मार्चपर्यंत सुरु राहणार आहे. अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या अकाली निधानामुळे अर्थसंकल्प राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सादर करतील.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली (पान २ वर)

# बांगलादेशींना कामावर ठेवल्यास आता थेट मालकांवर कारवाई
## ● राज्य सरकारचा कडक इशारा

वृत्तसंस्था । मुंबई

**घुसखोर बांगलादेशी नागरिकांना रोजगारासाठी आश्रय देणाऱ्या बांधकाम व्यावसायिक, व्यापारी आणि उद्योगपतींवर आता कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासंदर्भात गृह विभागाने अलीकडे परिपत्रक जारी केले असून सर्व प्रशासकीय विभागांना कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.**

मूठभर व्यावसायिकांच्या वैयक्तिक फायद्यामुळे अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याचे पोलीस विभागाने केलेल्या चौकशीत धक्कादायक वास्तव समोर आले आहे. बांधकाम व्यावसायिक, छोटे-मोठे उद्योजक आणि व्यापारी आपले वैयक्तिक आर्थिक हित जपण्यासाठी बांगलादेशी घुसखोरांना कामावर ठेवत आहेत. हे नागरिक स्वस्त मजुरीवर उपलब्ध होत असल्याने अनेक ठिकाणी त्यांना प्राधान्य दिले जाते. मात्र, यामुळे राज्याच्या आणि पर्यायाने देशाच्या राष्ट्रीय सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण होत असल्याचे सरकारने या परिपत्रकात नमूद केले आहे.

कोणत्याही व्यावसायिक आस्थापनांवर घुसखोर बांगलादेशी नागरिकांना कामगार म्हणून ठेवता येणार नाही. बांधकाम मजूर, मेकॅनिक आणि वेल्डर, वाहन चालक, प्लंबर आणि वेटर आदी क्षेत्रात बांगलादेशी कामगार आढळल्यास थेट मालकांना जबाबदार धरले (पान २ वर)

● घुसखोर नागरिक भारतात वास्तव्य करण्यासाठी बनावट कागदपत्रे आणि शासकीय दस्तऐवज तयार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तंत्रज्ञानाचा गैरवापर करून मूळ कागदपत्रांमध्ये छेडछाड केली जाते. यावर उपाय म्हणून, अर्जासोबत जोडलेल्या पुराव्यांची आणि कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी 'ऑनलाइन प्रणाली' विकसित करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे कागदपत्रे ज्या यंत्रणेने जारी केली आहेत, तिथूनच सत्यता तात्काळ पडताळणे शक्य होईल, असेही परिपत्रकात म्हटले आहे.

# नंदुरबारात ४० हजार विद्यार्थ्यांना शाही मेजवानी
## निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची चंद्रकांत रघुवंशी यांनी केली पूर्ती

प्रतिनिधी । नंदुरबार

**निवडणुकीत पार्टी देण्याचे आश्वासन पूर्ण करताना नंदुरबारमधल्या सुमारे ४० हजार शालेय विद्यार्थ्यांना पावभाजी आणि आईस्क्रिमजी मेजवानी देण्यात आली. शिवसेना शिंदे गटाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसांचे औचित्य साधून आश्वासन पूर्ती केली.**



सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जेवणावळी आणि पार्ट्या हा चर्चेचा विषय राहिला आहे. मतदारांना भुलविण्यासाठी उमेदवारांकडून नगरपरिषद निवडणुकीतदेखील मोठ्या जेवणावळी देण्यात आल्याच्या चर्चा रंगल्या. परंतु, जे मतदारच नाहीत, अशा बालगोपाळांना आणि मुलांना कोण पार्टी देणार, असा प्रश्न नेहमीच सर्वांना असतो. त्यामुळे बाल गोपाळांना शिवसेना शिंदे गटाचे नेते आमदार चंद्रकात रघुवंशी यांनी निवडणूकीनंतर पार्टीचे आश्वासन दिले होते.

निकाल काहीही लागो, तरीदेखील नंदुरबारमधल्या बालगोपाळांना मी पार्टी देईन, असे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचा योग साधत नंदुरबारमध्ये (पान २ वर)

● निवडणुकीतील आश्वासनपूर्तीची पार्टी म्हटल्यानंतर बालगोपाळांनी देखील पावभाजीवर चांगलाच ताव मारला. पहिली ते चौथीचे विद्यार्थी ही पावभाजी आणि आईस्क्रिम पार्टी नेमकी कशासाठी, हे माहीत नसतानाही मिळालेल्या पार्टीने खुष असल्याचे दिसून आले. या ४० हजार विद्यार्थ्यांच्या पावभाजी नियोजनासाठी शहरातील सर्वच पावभाजी विक्रेत्यांची बैठक घेवून त्यांना शाळानिहाय पावभाजीची ऑर्डर ठरवून देण्यात आली होती. त्यामुळे दोन दिवस दोन सत्रात होत असलेल्या या पार्टीचे नियोजनही उत्तम झाल्याचे दिसून आले.

शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
epaper.shauryamarathi.com



# संपादकीय

## शिक्षणाचा केरळ पॅटर्न

देशातील सर्वात साक्षर राज्य असलेल्या केरळने शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये एक नवा पॅटर्न आणला आहे, ज्याचे अनुकरण देशातील इतर राज्यांनी करायलाही हरकत नाही. केरळ राज्य सरकारचा वार्षिक अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला सर्वाधिक महत्त्व देण्यात आले असून राज्यामध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या राष्ट्रीय पातळीवर बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाते. पण पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेणारे केरळ हे पहिलेच राज्य असल्याने त्यांचा हा पॅटर्न निश्चितच अभिनंदनास पात्र आहे. केरळ सरकारने आजपर्यंत नेहमीच शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व दिले आहे. राज्यात कौशल्य विकास क्षेत्र असो, तंत्र विकास क्षेत्र असो किंवा नियमित पद्धतीने दिले जाणारे शिक्षण असो या सर्वच क्षेत्रांना प्राधान्य देण्याचे काम आजपर्यंत केरळ सरकारने केले आहे. आता पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करून शैक्षणिक धोरणातील सर्वसमावेशकता वाढवण्याचे काम केरळ सरकारने केले आहे. एकीकडे अनेक राज्यांमध्ये थेट आर्थिक फायदा देण्याच्या योजनांना प्राधान्य दिले जात असताना म्हणजेच लाडकी बहीण किंवा अशा स्वरूपाच्या योजना राबवण्यास प्राधान्य दिले जात असताना केरळ सरकारने मात्र थेटपणे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे केरळच्या तिजोरीला मोठा फटका निश्चितच बसणार आहे. पण मनुष्यबळाच्या विकासाचा विचार करता हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे. बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत असल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण किमान बारावी पास या निकषावर मोजले जात होते. पण केवळ केरळ राज्य नाही तर देशाच्या इतर भागांमध्येसुद्धा बारावीनंतर शिक्षण सोडून देऊन रोजगारामागे लागण्याचा अनेक विद्यार्थ्यांचा कल असतो. त्यामागे पदवीपर्यंतचे शिक्षण न परवडणे हे एक महत्त्वाचे कारण असते. पण आता पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाणार असल्याने विद्यार्थ्यांवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

# अखेर लाभार्थ्यांना वनजमीन पट्टे वाटप

## • वनहक्क म्हणजे सन्मान, सुरक्षितता अन् सर्वांगीण विकासाची नवी वाट : ना.डॉ. अशोक वुईके

प्रतिनिधी । नंदुरबार

**जनतेशी विश्वासाचा संवाद, शासन प्रशासनातील समन्वय आणि प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेतले, तर वनहक्क कायद्याचा खरा लाभ थेट आदिवासी कुटुंबांपर्यंत पोहोचतो. वनहक्क म्हणजे केवळ कागदोपत्री अधिकार नव्हे, तर सन्मान, सुरक्षितता आणि विकासाची सुरुवात आहे, असे प्रेरणादायी प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक बुईक यांनी केले.**



कार्यक्रमास आ.आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, नाशिक आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी अनय नांवदर (तळोदा), चंद्रकांत पवार (नंदुरबार), प्रमोद पाटील (धुळे) निलेश माळी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आज डॉ. उईके यांच्या हस्ते वनजमीन पट्टे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना मंत्री डॉ. बुईक यांनी नंदुरबार जिल्ह्यात वनहक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासनाने उचललेल्या पावलांचे विशेष कौतुक केले. अनुसूचित जमातीच्या बांधवांना वनहक्क देण्यात प्रभावी कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकारी म्हणून डॉ. मिताली सेठी यांची ओळख राज्यभर निर्माण झाली आहे, असे गौरवोद्गार काडले. वनहक्क मालकी पड़े देणे ही आदिवासी विकास विभागाची मुख्य जबाबदारी असली, तरी वनविभाग, महसूल विभाग आणि जिल्हा प्रशासन यांच्यातील सुसंवाद त्र समन्वयामुळेच ही प्रक्रिया गतीमान झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सविस्तर आढावा घेतल्यानंतर एक हजाराहून अधिक प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली, ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे ठळक उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले. सामूहिक वनहक्क असलेल्या दावेदारांसमोरील अडचणी अधोरेखित करत मंत्री वुईक म्हणाले की, सामूहिक वनहक्कांसाठी सामूहिक सातबारा असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजनांचा लाभ मिळत नाही. जोपर्यंत वैयक्तिक मालकी वनहक्क मिळत नाही, तोपर्यंत लाभ मर्यादित राहतो. त्यामुळे या विषयावर स्पष्ट आणि एकसमान मानक कार्यपद्धती तयार करण्याची नितांत गरज आहे. तसेच ज्या लाभाव्यौना वैयक्तिक वनहक्क मिळाले आहेत, त्यांच्या मोजणी, सीमा निर्धारण आणि नोंदणीसंबंधी प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश देताना त्यांनी सांगितले की, मोजणी होणार नाही, सीमा उरणार नाहीत, तोपर्यंत प्रश्न सुटणार नाहीत. म्हणूनच राज्यात प्राधान्य घेऊन नंदुरबार जिल्ह्याने मोजणीचे प्रश्न मार्गी लावणे अत्यावश्यक आहे. शासन आणि प्रशासनातील समन्वयातील दरीचा सर्वाधिक त्रास वनहक्क मालकांनाव सहन करावा लागतो, असे नमूद करून त्यांनी स्पष्ट केले की, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, ही वनहक्क मालकांची रास्त अपेक्षा आहे. लाभ मिळत नसेल तर केवळ बैठका घेण्याला अर्थ राहत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना विद्यासात घेऊनच त्यांच्या मतदारसंघात कार्यक्रम राबवावेत, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

आदिवासी विकास विभागाच्या धारणीसारख्या प्रकल्पांमधून जिल्हाधिकारी व प्रशासनाने शासकीय आश्रमशाळांना आदर्श नमुना स्वरूप दिल्याचा उल्लेख करत, अशा उपक्रमांचे अनुकरण इतर जिल्ह्यांनी करावे, असे आवाहन त्यांनी केले. राज्यात एक हजार सातशे एकाहत्तर शिक्षकांची भरती झाल्यामुळे आदिवासी भागातील शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. राणी दुर्गवती महिला सचलीकरण योजनेवाचत बोलताना मंत्री बुईक म्हणाले की, आदिवासी महिला केवळ स्वयंरोजगार करणाऱ्या नव्हे, तर इतरांना रोजगार देणाऱ्या सक्षम उद्योजिका व्हाव्यात, यासाठी शासन कटिबद्ध असून या उद्दिष्टासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. अनेक वर्षांनंतर झालेल्या या वनजमीन पड़े वाटप कार्यक्रमामुळे आदिवासी बांधवांच्या हक्कांना नवे बळ मिळाले असून, वनहक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीत नंदुरबार जिल्हा राज्यासाठी प्रेरणादायी आदर्श ठरत असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे.

# पान १ वरुन

### भारत टिकला तरच......

आदी उपस्थित होते. चांदवड तालुक्यातील मालसाणे येथे णमोकार तीर्थक्षेत्रात ६ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक आणि महामस्तकाभिषेक महोत्सव सुरु आहे. जैनधर्मियांचा कुंभमेळा समजल्या जाणाऱ्या या महोत्सवात मंगळवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे सहभागी झाले. यावेळी भागवत यांच्या हस्ते पंचपरमेष्ठी मंडपमचे उद्घाटन करण्यात आले. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर मालसाणे गावाजवळ ४० एकर क्षेत्रात जैनधर्मीय णमोकार तीर्थस्थळ साकारण्यात आले आहे. या ठिकाणी महोत्सव काळात तीन हजार मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होत असून ३०० ते ४०० जैन साधू, १० ते १२ लाख भाविक महोत्सवात सहभागी होण्याचा अंदाज आहे. गेल्या रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या महोत्सवात सहभागी झाले होते. त्यानंतर भागवत हे या महोत्सवात सहभागी झाले. या महोत्सवासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे.

### पाळधी येथे भीषण......

असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघातानंतर परिसरात मोठी गर्दी झाली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या भागात वारंवार लहान-मोठे अपघात होत असतात. मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. विशेषतः स्पीडब्रेकर नसल्याने वाहनांचा वेग कमी होत नाही. याशिवाय महामार्गालगत वाढलेले अतिक्रमण अपघातांची तीव्रता वाढवत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वारंवार मागणी करूनही संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे आजचा अपघात घडल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नेते विश्वजित पाटील हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ग्रामस्थांसह रास्तारोको आंदोलनाला सुरुवात केली. गेल्या तासाभरापासून सुरू असलेल्या आंदोलनामुळे जळगावसंभाजीनगर महामार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आंदोलकांशी चर्चा सुरू केली आहे. ग्रामस्थांनी मृत व्यक्तीच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्यावी, जखमींवर मोफत उपचार करावेत, तसेच पाळधी परिसरात त्वरित स्पीडब्रेकर बसवून अतिक्रमण हटवावे, अशी ठोस मागणी केली आहे. अपघातप्रवण ठिकाण म्हणून या भागाची ओळख निर्माण होत असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, असा इशाराही देण्यात आला आहे.

### जळगावसाठी वाढीव......

करण्यासाठी नवीन पोलीस ठाणे व उपविभागीय पोलीस कार्यालये, पोलीस निवासस्थाने दुरुस्ती, वाहने व सीसीटीव्ही यंत्रणा, आदिवासी भागातील १२ ग्रामपंचायत क्षेत्रातील ५१ पाड्यांना सौरऊर्जा जोडणी, १०० अंगणवाड्या व महिलांसाठी वसतिगृहे, महिला बचत गट भवन, तसेच जिल्हा परिषद अंतर्गत रस्ते व सिंचन बंधाऱ्यांसाठी निधीची अत्यावश्यक गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांसमोर बोलताना नमूद केले. तसेच दिव्यांगांसाठी डीपीडीसी अंतर्गत एक टक्का निधीबाबत शासन निर्णय तातडीने काढावा, कौशल्य विकास, कृषी, पशुसंवर्धन, उद्योग व महिला-बाल विकास विभागांच्या समन्वयातून जिल्हास्तरावर रोजगार व कौशल्य मेळावे आयोजित करण्यासाठी स्वतंत्र तरतूद करावी, अशा सूचना पाटील यांनी मांडली. या बैठकीस वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जैसवाल, अमळनेरचे आमदार अनिल पाटील, चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाच्या सचिव शैला ए., जिल्हा नियोजन अधिकारी भरत साळुंखे उपस्थित होते. जळगाव येथून जिल्हाधिकारी रोहन घुगे, महानगरपालिकेचे आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सुर्यवंशी, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी राहुल इधे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

### देश विकताना तुम्हाला......

शब्दांत हल्लाबोल केला. राहुल गांधींनी आपल्या भाषणात अर्थसंकल्पाबाबत तीव्र शब्दांत नापसंती व्यक्त करतानाच व्यावसायिक गौतम अदाणींचा उल्लेख केला. ङ्गङ्गआपल्या अर्थसंकल्पाच्या मूळ गाभ्यात मार्शल आर्ट्समधील डावपेचासारखा चोक (घट्ट पकड) आहे. हा चोक अदाणींनी लावलाय. अदाणी हे काही साधेसुधे व्यावसायिक नाहीत. त्यांची कंपनी काही साधी कंपनी नाही. अमेरिकेतल्या खटल्यात मोदींना लक्ष्य करण्यात आलं आहे. अदाणींना नाहीफ्फ, असं राहुल गांधी म्हणाले.

### राज्याच्या अर्थसंकल्पीय......

आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानपरिषद व विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अर्थसंकल्पीय अधिवेशनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

### बीडमध्ये पोलीस......

उपचार करण्यात आले. एक सलाईनही चढवण्यात आली. तपासणीमध्ये दीपकच्या नाडीचे ठोके कमी आढळून आल्याने दुपारी १.१४ च्या सुमारास दीपकला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### नंदुरबारात ४० हजार......

शिवसेनेच्या वतीने जवळपास ४० हजार शालेय विद्यार्थ्यांना पावभाजी पार्टी देण्यात आली. शहरातील सर्वच शाळांमध्ये रितसर परवानगी घेवून शिवसेनेने दोन दिवस विद्यार्थ्यांचे नियोजन करुन पावभाजी आणि आईस्क्रिमची पार्टी बालकांना दिली. नंदुरबारमधील निम्म्या शाळांमधील जवळपास २० हजार विद्यार्थ्यांना सकाळ आणि दुपारच्या सत्रात ही पार्टी देण्यात आली. उर्वरीत २० हजार विद्यार्थ्यांना दुसऱ्या दिवशी अशाच पद्धतीने नियोजन करुन पार्टी देण्यात आली. स्वत: आमदार चंद्रकांत रघुवंशी हे शाळांना भेट देवून त्याठिकाणच्या पावभाजी वाटपाचा आढावा घेत होते. विद्यार्थ्यांना पोटभर आणि पावही हवे तितके मिळाले की नाही याची देखील चौकशी करीत होते. निवडणुकीत दिलेले आश्वासन एकीकडे हवेत विरळ होत असून पुढारी त्याला सोईस्कररित्या विसरून जात असतांनाच जे मतदारच नाही अशांना दिलेला शब्ददेखील पाळण्यात आला. त्यामुळे या पावभाजी पार्टीची चर्चा नंदुरबारमध्ये चांगलीच रंगली. शिवसेनेने या पावभाजी पार्टीच्या माध्यमातून आगामी मतदारांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न तर नाही केला, असा मिश्कील प्रश्न देखील उपस्थित होत आहे.

### बांगलादेशींना कामावर......

जाणार आहे. यासाठी आवश्यकता असल्यास कायद्यात आणि नियमावलीत सुधारणा करण्याचे संकेतही परिपत्रकात दिले आहेत. 'राष्ट्रीय सुरक्षा सर्वोच्च' असल्याचे सांगत, कोणत्याही परिस्थितीत घुसखोरांना रोजगार दिला जाऊ नये, असे आदेश देण्यात आले आहेत.या निर्णयामुळे आता अवैध स्थलांतरितांना आश्रय देणाऱ्यांवर प्रशासनाचा वचक बसणार असून, बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्यांनाही चाप बसणार आहे.

## अक्कलकुवा बीएसएनएल कार्यालयात चोरी

**नंदूरबार ।** दरजावाचे नटबोल्ट काढून चोरट्याने बीएसएनएलचे कार्यालय फोडल्याची घटना अक्कलकुवा येथे घडली. याप्रकरणी अनोळखीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्कलकुवा येथे बीएसएनएलच्या कार्यालयात चोरी झाली आहे. चोरट्याने दरवजाचे नटबोल्ट काढून कार्यालयात प्रवेश केला. यावेळी चार हजाराचे सीपीयू, २५ हजाराचे दोन रेफ्टीफायर असे २९ हजाराचे साहित्य चोरीला गेले आहे.

# राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे आज धरणे

प्रतिनिधी । जळगाव



**केंद्र व राज्य शासनाच्या कर्मचारी कामगार विरोधी धोरणांचा निषेध व्यक्त करत तसेच दीर्घकाळापासून व प्रलंबित असलेल्या विविध न्याय्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सरकारी निमसरकारी कर्मचारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती, जळगाव व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, जळगाव यांच्या संयुक्त वतीने दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय येथे धरणा सत्याग्रह आयोजित करण्यात आला आहे.**

देश व राज्यातील लाखो कर्मचारी शिक्षकांच्या विविध मागण्या अद्याप प्रलंबित असून त्यामध्ये चार कामगार संहिता रद्द करणे, पीएफआरडीए कायदा रद्द करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करणे, आठवा वेतन आयोग लागू करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे, जुनी पेन्शन योजना (ओपीएस) लागू करणे, खाजगीकरण व कंत्राटीकरण धोरणास आळा घालणे, चतुर्थ श्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सेवकनिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, २००५ पूर्वीची सेवा पेन्शनसाठी ग्राह्य धरणे तसेच १०-२०-३० सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे आदी महत्त्वाच्या मागण्यांचा समावेश आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जळगाव जिल्हा राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मगन पाटील, सरचिटणीस सरचिटणीस-योगेश नन्नवरे, कार्याध्यक्ष वासुदेव जगताप, कोषाध्यक्ष घनःश्याम चौधरी, अमर परदेशी यांनी केले आहे.

# नेमसुशिल विद्यामंदिरात नृत्याविष्कारच्या माध्यमातून हर्षोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी । तळोदा

**येथील नेमसुशिल शैक्षणिक संस्थेत नृत्याविष्काराच्या माध्यमातून हर्षोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. सलग तीन दिवस चालणाऱ्या या हर्षोत्सवात २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत विविध नृत्याविष्कार सादर केले.**



यात वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, देशभक्ती नृत्य, समाज प्रबोधन नाटिका, लोककलेवर आधारित लावणी, स्त्री सक्षमीकरण, बालकामगार, मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार, लग्नातील पारंपरिक प्रथा, शिवतांडव, ॲसिड हल्ला, आदिवासी नृत्य अशा विविध विषयांवर आविष्कार सादर करण्यात आले. यावेळी रसिक प्रेक्षकांनी कलाकार विद्यार्थ्यांना दाद दिली. याप्रसंगी मुख्याध्यापिका पुष्पा बागुल यांच्या संकल्पनेतून लोप पावत चाललेला व्यवसाय सुया पोत विक्री करणारी स्त्री तनिष्का कलाल ह्या विद्यार्थिनीच्या माध्यमातून सादर करण्यात आला. तसेच परिसरात सेल्फी पॉईंट व हर्षिल तुरखिया यांची रांगोळी प्रमुख आकर्षणाचा विषय ठरला. यावेळी खाऊगल्लीचे देखील आयोजन करण्यात आले. कार्यक्रमप्रसंगी परिक्षक म्हणून गोविंद सामुद्रे, अंकिता वर्मा, मुकेश गायकवाड, दर्शना जमदाडे, दीपाली कलाल, भूमिका बच्छाव यांनी कामकाज पाहिले. तर प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी अध्यक्ष निखिलकुमार तुरखिया, संचालिका सोनाबेन तुरखिया, शउपाध्यक्ष डी. एम. महाले, सचिव संजय पटेल, मुख्याध्यापिका पुष्पा बागुल, प्राचार्य सुनिल परदेशी, प्रिन्सिपल पी.डी. वाणी, वसंत पाटील, मॅनेजर नितीन वाणी, हर्षिल तुरखिया, सुनिल मराठे, मुख्याध्यापिका भावना डोंगरे, गणेश बेलेकर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# आदिवासी वनहक्क कायद्याची तत्काळ अंमलबजावणी करा!

## • सत्यशोधक शेतकरी सभेचे आदिवासी विकास मंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी । नवापूर

**नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी वनहक्क कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याबाबत व सत्यशोधक शेतकरी सभेच्या प्रलंबित मागण्यांसाठी आदिवासी विकास मंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे.**



सन २०२३ मध्ये नंदुरबार ते मुंबई असा हजारो आदिवासी स्त्री-पुरुषांचा पायी बिढार महामोर्चा काढण्यात आला होता. हा मोर्चा नाशिक येथे आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करून लेखी आश्वासन दिल्याने मोर्चा स्थगित करण्यात आला होता. मात्र तीन वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, वनहक्क कायद्यांतर्गत स्थळ पाहणी, जीपीएस नकाशे, ग्रामसभेचे ठराव व इतर वैध पुरावे असूनही अनेक दावे अपात्र ठरविण्यात आले आहेत. सुधारित अधिनियम २०१२ व शासन निर्णय १६ जानेवारी २०१६ नुसार नव्याने स्थळ पाहणी करून पात्र दावेदारांना सात-बारा उतारे देण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. याशिवाय वन कायदा २०१९ रद्द करावा, अनुसूची जेफरद्द करून मालकी हक्काचे उतारे द्यावेत, प्रलंबित व पात्र वनहक्क दावेदारांना फार्मर्स आय डी व ई-पीक पाहणी पमध्ये समाविष्ट करावे, तसेच मागेल त्याला सोलर पंप योजनेत वनहक्कधारकांना लाभ देण्यासाठी तात्पुरती ऑफलाईन कार्यवाही करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

एम आय डी सी नवापूर अंतर्गत स्थानिक बेरोजगार तरुणांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा सुरू कराव्यात, कोटडा व नांदवन येथील गायरान जमिनी गावाच्या नावावर परत हस्तांतरित कराव्यात, तसेच वनपट्टा मिळालेल्या जमिनींच्या सुधारणा कामात अडथळे आणणाऱ्या संबंधित वन अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. पेसा क्षेत्रात खासगी कंपन्यांकडून ग्रामसभेची परवानगी न घेता माती उत्खनन व सर्वेक्षण सुरू असल्याचा आरोप करत, अशा कंपन्यांवर आदिवासी अत्याचार प्रतिबंधक कायदा, पेसा कायदा व इतर कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या सर्व मागण्यांबाबत तात्काळ व वेळबद्ध निर्णय घेऊन आदिवासी समाजाला न्याय द्यावा, अन्यथा पुन्हा नंदुरबार ते मुंबई पायी महामोर्चा काढण्याची वेळ येईल, असा इशाराही सत्यशोधक शेतकरी सभेच्यावतीने देण्यात आला आहे.

## माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन

प्रतिनिधी । तळोदा

**येथील प्रज्ञासूर्य फाउंडेशन व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नगरसेविका जयश्री महाले होत्या. रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर कार्यक्रमात रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनावर पुष्पा ब्राह्मणे व सुजाता साळवे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडण्यामागे रमाई आंबेडकर यांचा मोठा त्याग व समर्पण आहे. त्यांच्या त्यागामुळे आज समाजातील स्त्रिया सन्मानाने जीवन जगत आहेत. बाबासाहेबांच्या पश्चात त्यांनी कुटुंबाकडे लक्ष देऊन बाबासाहेबांची कमी कुटुंबाला जाणवू दिली नाही. याबाबत बाबासाहेबांनी देखील रमाई आंबेडकर यांच्याबद्दल नेहमीच कृतज्ञता व्यक्त केल्याचे दिसून येते, असल्याचे त्या म्हणाल्या.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# मनपाच्या स्थायी समितीवर राहणार भाजपाचे वर्चस्व!

## पक्षनिहाय संख्याबळावर शिक्कामोर्तब; १६ फेब्रुवारीला होणार महासभेत घोषणा

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महापालिकेच्या स्थायी समितीसाठी भाजपचे १०, शिवसेनेचे ५, तर शिवसेना ठाकरे गटाचा १ सदस्य राहणार आहे. तसेच महिला-बालकल्याण समितीसाठी पक्षनिहाय बलाबलाच्या संख्याबळावर शिक्कामोर्तब करण्यात आला असून दि. १६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महासभेत सदस्यांच्या नावाची घोषणा अधिकृत करण्यात येणार आहे,अशी माहिती महापौर दीपमाला काळे आणि उपमहापौर मनोज चौधरी यांनी दिली.**





■ **महासभेत होणार सदस्यांची नावे निश्चित...**

सोमवार, दि.१६ रोजी होणाऱ्या महासभेत या सदस्यांची नावे निश्चित झाल्यानंतर दोन्ही समित्यांच्या सभापती निवडीसाठीची नावे विभागीय आयुक्तांकडे पाठवली जाणार आहे. त्यानंतर सभापतींच्या नावांना अधिकृत मंजुरी दिली जाईल.

जळगाव महानगरपालिकेच्या सतरा मजली इमारतीमधील महापौर दालनात बुधवारी दि. ११ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत आगामी विषय समित्यांच्या संख्याबळाची अधिकृत माहिती देण्यात आली. महापौर दीपमाला काळे आणि उपमहापौर मनोज चौधरी यांनी यावेळी समितीमधील पक्षनिहाय बलाबल स्पष्ट केले. येत्या सोमवार, दि. १६ रोजी सकाळी ११ वाजता महासभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेत दोन्ही महत्त्वाच्या समित्यांच्या सदस्यांची नावे अंतिम केली जाणार आहेत.

स्थायी समितीमध्ये भाजपचे १०, शिवसेनेचे ५, तर शिवसेना ठाकरे गटाचा १ सदस्य राहील. तसेच महिला व बालकल्याण समितीमध्ये भाजप ५, शिवसेना ३ आणि शिवसेना ठाकरे गटाचा १ सदस्य अशा पद्धतीने संख्याबळ निश्चित करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला भाजपचे गटनेते प्रकाश बालानी, उपगटनेते नितीन बरडे, प्रतोद डॉ. चंद्रशेखर पाटील, महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, शिवसेनेचे गटनेते विष्णू भंगाळे, शिवसेना ठाकरे गटाचे गटनेते इब्राहिम पटेल आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) गटनेते प्रफुल्ल देवकर यांच्यासह महायुतीचे सर्व नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

**स्थायी समिती**

| | |
|---|---|
| भाजप | १० |
| शिवसेना | ५ |
| ठाकरे गट | १ |

**महिला, बालकल्याण**

| | |
|---|---|
| भाजप | ५ |
| शिवसेना | ३ |
| ठाकरे गट | १ |

# अशोक जैन यांच्या वाढदिवसानिमित्त जैन मॅडरिन-१ संत्रा वाणाचे लोकार्पण

- जैन इरिगेशनचा शेतकऱ्यांसाठी नवा उत्पन्नक्षम पर्याय
- दुसऱ्या वर्षापासून फळधारणा

प्रतिनिधी । जळगाव



**जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेडतर्फे संशोधित व विकसित करण्यात आलेल्या 'जैन मॅडरिन-१' या नव्या संत्रा वाणाचे लोकार्पण जैन हिल्स येथे उत्साहात करण्यात आले. अशोक जैन व ज्योती जैन यांच्याहस्ते हा सोहळा पार पडला.**

कार्यक्रमास जैन परिवारातील सदस्य, कृषितज्ज्ञ, शास्त्रज्ञ तसेच कंपनीचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'जैन मॅडरिन-१' हा शेतकऱ्यांसाठी विकसित करण्यात आलेला आधुनिक, उच्च उत्पादनक्षम वाण असून पारंपरिक संत्र्यांच्या तुलनेत लवकर फळधारणा करणारा आहे. लागवडीच्या दुसऱ्याच वर्षापासून झाडांना फळे येण्यास सुरुवात होत असल्याने बागायतीवरील गुंतवणुकीवर जलद परतावा मिळण्यास मदत होते. कमी कालावधीत बाजारात दर्जेदार फळ उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्याची संधी वाढते. या वाणाची चव नागपूर संत्र्यापेक्षा अधिक गोड असून फळांचा रंग गडद लालसर-केशरी आहे. आकर्षक आकार, सोलण्यास सुलभता आणि अधिक रसाळपणा यामुळे 'जैन मॅडरिन-१' हा टेबल पर्पजसाठी विशेष उपयुक्त मानला जात आहे. दर्जेदार व एकसमान उत्पादनामुळे देशांतर्गत बाजारपेठेबरोबरच निर्यातक्षमतेच्या दृष्टीनेही हा वाण आशादायक ठरू शकतो, असा विश्वास कंपनीचे लिंबूवर्गीय फळांचे संशोधक डॉ.मिलिंद लदानिया यांनी व्यक्त केला. उत्पादनक्षमतेबरोबरच या वाणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे फुलधारणेसाठी पाण्याचा ताण देण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे पाणी व्यवस्थापन अधिक सुलभ होते.

कमी पाण्यातही स्थिर व भरघोस उत्पादन देण्याची क्षमता असल्याने बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर मर्यादित संसाधनांमध्ये शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 'जैन मॅडरिन-१' हा विश्वासार्ह व फायदेशीर पर्याय ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# पैशांच्या वादातून आईला शिवीगाळ

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील पंढरपूरनगर परिसरात पैशांच्या कारणावरून एका तरुणाने कुटुंबावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शंतनू चंद्रकांत गुरव (रा. हनुमाननगर, अयोध्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार मयूर गुरव (वय २१, रा. पंढरपूरनगर) हे आपल्या कुटुंबासह राहतात. २ फेब्रुवारी रोजी रात्री ११.३० च्या सुमारास संशयित आरोपी शंतनू हा मयूरच्या घरी आला आणि त्याने मयूरच्या आईकडे पैशांची मागणी केली. मात्र, आईने माझ्याकडे पैसे नाहीत, असे सांगताच शंतनूचा राग अनावर झाला आणि शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

## थोडक्यात

### समता सैनिक दलची २० रोजी बैठक

**जळगाव ।** समता सैनिक दल (संस्थापक-विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर) शाखा जळगाव जिल्हा (पश्चिम) विभागाची बैठक दि.२० फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता पद्मालय विश्रामगृह जळगाव येथे आयोजित केली आहे. या बैठकीला समता सैनिक दल राज्याध्यक्ष धर्मभूषण बागुल हे मार्गदर्शन करतील. या बैठकीला उपस्थितीचे आवाहन राज्य संघटक विजय निकम, जिल्हाध्यक्ष पश्चिम किशोर डोंगरे, जिल्हा सचिव अनिल सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष विलास शिंदे, जिल्हा प्रचारक किरण शर्मा यांनी केले आहे.

### डॉ.निकेतन जाधवचे नृत्य स्पर्धेत यश

**जळगाव ।** येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील डॉ. निकेतन जाधव यांनी नाशिक येथे पार पडलेल्या आरोह-२०२६ या आंतरमहाविद्यालयीन नृत्य स्पर्धेत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील २० स्पर्धक सहभागी झाले होते.

# सरस्वती माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील आमोदे बु येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयामध्ये सन १९९९ ते २००० या दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या स्नेह मेळाव्यास ६५ पेक्षा अधिक माजी विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.**



जळगाव तालुक्यातील आमोदे बु., गाढोदे, जामोद, पळसोद तसेच धरणगाव तालुक्यातील दहिदुल्ला या गावातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रमुख वाटा होता. पंचक्रोशितील गावांसाठी या विद्यालयाचा खूप लाभ होतो. सन १९८५ मध्ये स्थापन झालेल्या या विद्यालयाने यंदा आपली ४० वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण केली असून, त्यापार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि राष्ट्रगीताने करण्यात आली.

या प्रसंगी विद्यालयातील माजी विद्यार्थी व विद्यमान शिक्षकांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना अनेक विद्यार्थी भावूक झाले. यात शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांनीसुद्धा मनोगत आणि आपला परिचय करून दिला.

या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थी, नाशिक येथील उद्योजक गुलाबराव पाटील यांनी विद्यालयाला उत्तम दर्जाचा प्रिंटर भेट दिला. तसेच भविष्यात शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी, यासाठी अध्ययनास उपयुक्त शैक्षणिक साहित्य व उपकरणे भेट देण्याचे आश्वासनही माजी विद्यार्थ्यांनी दिले.

कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आपले अनुभव कथन केले. शाळेने दिलेल्या संस्कारांमुळेच आज विविध क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करता आली, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

हा स्नेहमेळावा आपुलकी, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम ठरला, अशा भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

# नवीन बसस्थानकावर प्रवाशांची सुरक्षा रामभरोसे

प्रतिनिधी । जळगाव

**शहराचे मध्यवर्ती ठिकाण मानल्या जाणाऱ्या नवीन बसस्थानकावर प्रवाशांची सुरक्षा सध्या रामभरोसे असल्याचे विदारक चित्र आहे. जळगाव नवीन बसस्थानकावरील पोलीस चौकी ओस पडली असून, पोलिसांच्या अनुपस्थितीमुळे पाकीटमार आणि साखळी चोरांचे चांगलेच फावले आहे. खाकीचा वचक नसल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

बसस्थानकावर दररोज गर्दीचा फायदा घेत मोबाईल आणि पाकीट चोरीच्या घटना घडतात. मात्र, चोरीला गेलेली रक्कम कमी असल्यास पोलीस ठाण्याच्या फेऱ्या नको म्हणून अनेक प्रवासी तक्रार देण्यास पुढे येत नाहीत. याचाच गैरफायदा गुन्हेगार घेत असून बसस्थानकावर चोरांची मोठी टोळी सक्रिय असल्याची शंका व्यक्त होत आहे. जिल्हापेठ पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक अनिल वाघ यांनी सांगितले की, बसस्थानकावर पोलिसांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मात्र, पोलीस चौकीची अवस्था अत्यंत खराब असल्याने कर्मचाऱ्यांना बाकांवर बसून कर्तव्य बजावावे लागत आहे. प्रभारी अधिकारी म्हणून मी स्वतः या प्रकरणात लक्ष घातले असून, लवकरच येथील सुरक्षेबाबत ठोस पावले उचलली जातील. आता बसस्थानक प्रशासन आणि पोलीस विभाग मिळून या असुरक्षिततेच्या वातावरणातून प्रवाशांची सुटका कधी करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

■ **धुळखात पडलेली पोलीस चौकी...**

बसस्थानकात प्रवाशांच्या मदतीसाठी स्वतंत्र पोलीस कक्ष उभारण्यात आला आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून हा कक्ष बंद असल्याने त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. बसस्थानक प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले असून, व्यवस्थापकांशी संपर्क साधला असता त्यांच्याकडूनही प्रतिसाद मिळत नसल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

### जिल्हा सचिवपदी डॉ. विवेक पाटील




**जळगाव ।** भारत होमिओपॅथिक असोसिएशन च्यावतीने जळगाव जिल्ह्याची नवीन पदाधिकारी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील होमिओपॅथी क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ.विवेक मनोहर पाटील यांची जिल्हा सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. पाटील यांच्या कार्यक्षमता, संघटनात्मक सहभाग तसेच सेवाभावी योगदानाची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आली आहे.

# अक्षय वधू-वर सूचक, संकलन केंद्रात मोफत नाव नोंदणी

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील अक्षय वधू-वर सूचक व संकलन केंद्र शिवकॉलनी जळगाव येथे सर्वांसाठी मोफत नाव नोंदणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.**



अक्षय वधू-वर केंद्रात सकाळी ९ ते १ व दुपारी ४ ते ६ या वेळात प्रथम वर-वधू, विधूर-विधवा, सापत्य विनापत्य घटस्फोटीत, प्रौढ वर-वधू, ज्येष्ठ नागरिक बंधू-भगिनी तसेच जातीय- आंतरजातीय व रजिष्टर्ड अथवा सामुदायिक विवाह करु इच्छिणाऱ्यांसाठी ही नोंदणी दि.२० फेब्रवारीपर्यंत मोफत केली जाणार आहे. तसेच अक्षय वधू-वर केंद्रातर्फे फेब्रुवारी व मार्च महिन्यात मेळावे होणार आहे. नाव नोंदणीसाठी पासपोर्ट फोटो, बायोडाटा, शैक्षणिक पात्रता सर्टिफिकेट, पगार दाखला, आधारकार्ड झेरॉक्स, व्यवसाय असल्यास त्याचे फोटो, घटस्फोटीत वा विधुर- विधवा असल्यास त्याचे कागदपत्र आणणे आवश्यक राहील.

रविवारी कार्यालय बंद राहील, असे श्री व सौ देवळे यांनी कळविले आहे.

# मेहरुण तलावात सांडपाणी थांबणार

## महापौरांनी अधिकाऱ्यांना दिला २१ दिवसांचा अल्टिमेटम

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील नैसर्गिक सौंदर्याचा वारसा असलेल्या मेहरुण तलावात थेट गटारीचे सांडपाणी मिसळत असल्याचा गंभीर प्रकार समोर आल्याने जळगाव शहरात मोठी खळबळ उडाली आहे. या संदर्भात सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर महापौर दीपमाला काळे यांनी तातडीने दखल घेत ९ फेब्रुवारी रोजी महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या ताफ्यासह तलाव परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.**



**कामात कोणतीही दिरंगाई नको**

या समस्यासंदर्भात २१ दिवसांच्या आत सांडपाण्यासाठी स्वतंत्र आणि प्रभावी पर्यायी यंत्रणा उभारण्याचे निर्देश महापौर यांनी दिले आहेत. मेहरुण तलावाची जैवविविधता आणि सौंदर्य टिकवण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे सांगतानाच, महापौरांनी या कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून स्थानिक नागरिकांनी तलावातील वाढत्या दुर्गंधीबाबत आणि दूषित पाण्यामुळे जलचरांना होणाऱ्या त्रासाबाबत तक्रारी केल्या होत्या. ज्याची दखल घेत महापौरांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन वस्तुस्थितीची पाहणी केली. या पाहणीदरम्यान सांडपाणी थेट तलावाच्या पात्रात जात असल्याचे स्पष्ट झाल्याने महापौरांनी प्रशासकीय यंत्रणेची कडक शब्दांत कानउघडणी केली. तलावाचे प्रदूषण ही केवळ पर्यावरणाची हानी नसून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ असल्याचे त्यांनी नमूद केले. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापौरांनी शहर अभियंता योगेश बोरोले यांना तातडीने आदेश दिले आहे.

# मेहरुण येथे महामाता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी

प्रतिनिधी । जळगाव

**माता रमाई आंबेडकर माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मेहरूण येथे महामाता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**



माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस संस्थेचे सचिव शामकांत तायडे यांनी मल्यार्पण करून कोटी कोटी प्रणाम केले. शालेय समिती अध्यक्ष प्रकाश तायडे यांनीही माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी सर्वांनी सामूहिक बुद्ध वंदना, त्रिशरण, पंचशील ग्रहण केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे सचिव शामकांत तायडे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी शालेय समिती अध्यक्ष प्रकाश तायडे, माजी प्राचार्य श्रीकांत तायडे, प्राचार्य हर्षा पाटील, प्रदीप इंगळे, पूनम भंगाळे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी आणि शिक्षक यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या बद्दल आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी प्रकाश तायडे यांनीही माता रमाई आंबेडकर यांच्या कार्याबद्दल विशद करून मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात शामकांत तायडे यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या योगदानाबद्दल माहिती दिली. सूत्रसंचालन पूनम भंगाळे यांनी केले. आभार क्रांती नारखेडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी अनिल अत्तरदे, शालू सैंदाणे, योगिता भास्कर, भारती चौधरी, किशोर सैंदाणे, नितीन सपकाळे, लक्ष्मण पाटील, प्रभाकर खर्चे, रवींद्र तायडे, मच्छिंद्र साळुंखे, दीपक पारधी यांनी परिश्रम घेतले.

# वरणगाव नगरपरिषदेची पहिलीच सर्वसाधारण सभा ठरणार वादळी!

## भोगावती नदी भ्रष्टाचारप्रकरणी नगराध्यक्ष सुनील काळे यांना सत्ताधारी भाजप अन् शिवसेनेच्या नगरसेवकांकडून घेरण्याची व्यूहरचना

संतोष माळी । वरणगाव

**येथील नगरपरिषदेची पहिलीच सर्वसाधारण सभा येत्या शुक्रवार दि.१३ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या सर्वसाधारण सभेच्या पहिल्याच अजेंड्यावर जंबो असे ७९ विषय घेण्यात आले आहेत. परंतु गेल्या काही दिवसांपासून शहरात भाजपच्या नगरसेवकांनी भोगावती नदी बांधकामप्रकरणी भ्रष्टाचाराचे आरोप थेट लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील काळे यांच्यावर करून चौकशीची मागणी केल्याने हा मुद्दा शहरात सध्या गाजतो आहे. त्यातच शुक्रवारी होणाऱ्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत हा मुद्दा उपस्थित करून भाजप आणि शिवसेनेच्या नगरसेवकांनी नगराध्यक्ष सुनील काळे यांना घेरण्याची व्यूहरचना आखल्याचे समजते.**




वरणगाव नगरपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत लोकनियुक्त नगराध्यक्षपदासाठी उभे असलेले अपक्ष उमेदवार सुनील रमेश काळे हे विजयी झाले. भारतीय जनता पार्टीचे १४ नगरसेवक आणि शिवसेनेचे ५ तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एस.पी)चे २ नगरसेवक निवडून आले. परंतु सुनील काळे यांना भाजपच्या १४ जणांच्या गट नोंदणीमध्ये घेतले नाही. त्यामुळे निवडून आलेले भाजपचे नगरसेवक नगराध्यक्ष सुनील काळे यांना भाजपचे मानत नाही. त्यामुळे सुनील काळे यांनी आपली वेगळी चूल मांडली आहे. भाजप नगरसेवक सुनील काळे यांच्यासोबत नसल्याने पहिल्याच सर्वसाधारण सभेत ते भ्रष्टाचाराच्या आरोपांचा सामना करतील का? की हे आरोप उलथून लावतील हे येत्या सर्वसाधारण सभेत दिसून येईल.

मागील अडीच वर्षाच्या कार्यकाळात सुनील काळे हेच नगराध्यक्ष होते. त्यावेळी भोगावती नदीत घाट बांधकाम, सुशोभीकरण केल्याच्या नावाखाली सुवर्ण स्वच्छता सर्वेक्षण यांच्याकडून ५ कोटी मिळाले होते. त्या पाच कोटींमधून भोगावती नदीत काही कामे झाली. काही अपूर्णावस्थेत आहेत. यात भ्रष्टाचार झाल्याचे सांगून त्याची चौकशी करण्यात यावी, असे निवेदन देऊन मागणी करण्यात आली होती.

### “ शिवसेनेची भूमिका नेहमी चांगल्या कामांना राहील...



वरणगाव शहरात विकासात्मक चांगल्या कामाला शिवसेनेचा विरोध नसेल. परंतु चुकीच्या आणि निकृष्ट दर्जाच्या कामांना आमचा विरोध नेहमी राहील. सर्वसाधारण सभेत चुकीच्या नियमबाह्य ठरावांना विरोध केल्याशिवाय राहणार नाही.

**– तृप्ता महाजन, गटनेत्या, शिवसेना**

### “ अजेंड्यावरील चुकीच्या विषयांना विरोध राहील...



नगरपरिषदेची पहिलीच सर्वसाधारण सभा शुक्रवारी होणार आहे. या सभेच्या अजेंड्यावरील काही विषय हे नगरपरिषदेच्या अखत्यारीत येत नाही. असे विषय घेण्यात आले आहे. अशा विषयांना शिवसेनेचा कायम विरोध राहील. मात्र, विकास कामांना सहकार्य राहील.

**– राजेंद्र चौधरी, नगरसेवक, शिवसेना**



अजेंड्यावरील काही विषयासंदर्भात लेखी पत्र दिले आहे. येत्या १३ तारखेला नगरपरिषदेची पहिलीच सर्वसाधारण सभा होत आहे. या सभेच्या आम्हाला आलेल्या अजेंड्यावरील एकूण ७९ विषयांपैकी काही विषयासंदर्भात आम्ही हरकती घेतल्या आहे. त्या लेखी स्वरूपात नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत. आमचे चांगल्या विकास कामांना समर्थन राहील. मात्र चुकीच्या कामांच्या ठरावाला आमचा विरोध कायम राहील.

**– दीपाली माळी, गटनेत्या, भाजप**

## थोडक्यात

### डिजिटल थेरी कॉम्पिटिशनचे आयोजन

**पारोळा ।** येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना देण्यासाठी डिजिटल थेरी कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा दि. ७ रोजी अकॅडमीच्या प्रांगणात पार पडली. या स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांची अभ्यासाची क्षमता वाढवणे, तर्कशक्ती व टीमवर्क वाढवणे हा होता.

स्पर्धेमध्ये डिजिटल थेरी अंतर्गत शिकवलेले विविध विषय समाविष्ट होते. स्पर्धा मुलींचा व मुलांचा अशा दोन गटांमध्ये घेण्यात आली. चुरशीच्या लढतीनंतर मुलींच्या संघाने विजय मिळवला. मुलींच्या संघाची कॅप्टन म्हणून स्वरा मराठे यांनी प्रभावी नेतृत्व केले, तर मुलांच्या मुलांच्या संघाचे कॅप्टन आयुष पाटील होते. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुलांमधून साई कैलास पाटील यांना सर्वोत्कृष्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर मुलींमधून दर्शना गोपाल महाजन यांनी सर्वोत्तम कामगिरी केली. या कार्यक्रमास प्रवक्ता अकॅडमीचे संस्थापक रवींद्र पाटील, भारत व नेपाळ प्रवक्ता अकॅडमीच्या संस्थापिका रूपाली पाटील, अकॅडमीचे प्राचार्य मंगेश पवार, उपप्राचार्य दीपाली शिंपी उपस्थित होते.

## महिलेचे अडीच लाखांचे दागिने लंपास

प्रतिनिधी । भुसावळ

**शहरात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून, एका मंगल कार्यालयातून महिलेची पर्स लंपास करण्यात आल्याची घटना घडली. या पर्समध्ये सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण २ लाख ४९ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल होता.**

फिर्यादी उज्ज्वल भावे (वय ५०, रा. प्रल्हाद नगर, भुसावळ) या ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी भुसावळ शहरातील बालाजी हॉल येथे एका कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. दुपारी ४ ते ४:३० वाजेच्या सुमारास त्या हॉलमधील सोफ्यावर बसलेल्या असताना, कोणातरी अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून सोफ्यावर ठेवलेली पर्स चोरून नेली. याप्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाजारपेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भारती काळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. भरवस्तीत आणि गर्दीच्या ठिकाणी झालेल्या या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. नागरिकांनी सार्वजनिक कार्यक्रमात आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## सामाजिक न्याय विभागाच्या निवासी शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी । चाळीसगाव

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या शासकीय निवासी शाळा, चाळीसगाव येथे रविवारी स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साही वातावरणात पार पडला.**

कार्यक्रमास नगराध्यक्षा प्रतिभा चव्हाण प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी समाज कल्याण सहायक आयुक्त योगेश पाटील, विशेष अधिकारी अमोल कुलकर्णी, मुख्याध्यापक सागर विशे, अधीक्षक लक्ष्मीकांत कोठावदे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला घर घर संविधान उपक्रमांतर्गत संविधान मंचाचे उद्घाटन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. नगराध्यक्षा प्रतिभा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना संविधान मूल्ये, शिक्षण व सामाजिक समतेचे महत्त्व विशद करत मोठी स्वप्ने पाहण्याचे आवाहन केले. समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त योगेश पाटील यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त व परिश्रमाचे महत्त्व समजावून सांगितले. यशस्वी होण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता नव्हे तर चिकाटी, वाचन संस्कृती आणि मूल्याधिष्ठित जीवनशैली आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंजाबराव पाटील व दीपाली तडवी यांनी केले.

## दिव्यांगांना शैक्षणिक साहित्य वाटप

### नगराध्यक्षा लीला चौधरी यांच्याहस्ते वितरण

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील मूकबधिर विद्यालयात सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविण्यात आला. जैन इरिगेशनचे संचालक उद्योगपती अशोकभाऊ जैन यांच्या वाढदिवसानिमित्त भवरलालभाऊ जैन सार्वजनिक वाचनालय, धरणगाव यांच्या वतीने अन्नदान व शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**



या कार्यक्रमात नगराध्यक्षा लीला चौधरी यांच्या हस्ते दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष पी.एम.पाटील उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक निलेश चौधरी, नगरसेवक किशोर कंखरे, गुलाब मराठे, परमेश्वर महाजन, भागवत चौधरी, चेतन जाधव, हेमंत महाजन, वाचनालयाचे उपाध्यक्ष चंदनराव पाटील, माजी नगरसेवक नंदकिशोर पाटील, व्यापारी सेनेचे तालुकाप्रमुख निलेश वाणी, विनोद रोकडे, मेडिकल असोसिएशनचे छोटू जाधव, मराठा सेवा संघाचे नितीन पवार आदी मान्यवर उपस्थित होते. मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक वाल्मीक पाटील, उपमुख्याध्यापक संतोष भडांगे, वाचनालयाचे संचालक रामकृष्ण पाटील, प्रतापराव पाटील, सचिव योगेश पाटील पदाधिकारी, शिक्षक-कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगराध्यक्षा लीला चौधरी यांच्यासह सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. एच. पाटील यांनी केले. या उपक्रमामुळे मूकबधिर विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

## वरणगाव भाजप कार्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय यांना अभिवादन

प्रतिनिधी । वरणगाव

**येथील भारतीय जनता पार्टी शहर कार्यालयात दि.११ फेब्रुवारी रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून भाजपचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याकडून अभिवादन करण्यात आले.**



आजचा दिवस हा ‘समर्पण दिवस’ म्हणून साजरा करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. जनसंघ आणि भाजपसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय हे संघटनात्मक आणि वैचारिक विचारांचे होते. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडली.

त्यांच्या पुण्यतिथीचे स्मरण करून दरवर्षी प्रमाणे ११ फेब्रुवारी हा दिवस समर्पण दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात भाजपचे तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, वरणगाव उपनगराध्यक्ष अरुणा इंगळे, नगरसेविका शामल झांबरे, वृषाली चौधरी, बांधकाम सभापती श्रद्धा गायकवाड, सार्वजनिक स्वच्छता सभापती भाग्यश्री सोनवणे, पाणीपुरवठा सभापती निलेश खाचणे, शहराध्यक्ष पप्पू माळी, माजी सरपंच सुभाष धनगर, महेश सोनवणे, इफ्तिकार मिर्जा, बापू महाजन यांच्यासह कार्यकर्ते व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## रोटरी क्लबच्या कर्करोगनिदान शिबिरात १३५ रुग्णांची तपासणी

प्रतिनिधी । धरणगाव

**रोटरी क्लबच्या वतीने भव्य मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन नगरपालिकेच्या आवारात आज करण्यात आले होते. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरामध्ये महिलांसाठी मोफत पॅपस्मीयर, मॅमोग्राफी व बायोप्सी तपासण्या करण्यात आल्या.**




तपासणीसाठी नाशिक येथून तज्ञ डॉक्टरांची विशेष टीम उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.ए.आर.पाटील यांनी केले. शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्षा लीला चौधरी, उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन, नगरसेविका ज्योती पाटील, हेमांगी अग्निहोत्री तसेच इतर नगरसेवकांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी रोटरी क्लबचे मेडिकल चेअरमन डॉ.मनोज अमृतकर, अध्यक्ष प्रा.ए. आर. पाटील, सचिव डॉ. अतुल शिंदे व उपाध्यक्ष पल्लवी शिंगाणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमास धरणगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय चव्हाण, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक साळुंखे, डॉ.मयूर जैन, पालिकेचे कार्यालयीन अधीक्षक भिकन पारधी तसेच डॉक्टर असो. चे डॉ.अरुण कुलकर्णी, डॉ.मिलिंद डहाळे, डॉ.शैलेश सूर्यवंशी, डॉ. पंकज अमृतकर, डॉ.सुचित जैन, डॉ.अभिजीत पाटील व डॉ. सचिन पेंढारे यांची उपस्थिती लाभली. याशिवाय रोटरी क्लब अमळनेर व जळगावचे पदाधिकारी तसेच मेडिकल अध्यक्ष सुधाकर वाणी यांनीही सहभाग नोंदविला. शिबिर यशस्वीतेसाठी नगरसेवक सुनील चौधरी, मनोज ठाकरे सर, प्रा.डी. डी. पाटील, जितेंद्र पित्रोडा, किशोर येवले, रविंद्र हरपे, भैय्या मराठे, रोहित अग्निहोत्री, उदय पाटील, पराग कुलकर्णी यांच्यासह रोटरी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## चोपडा महाविद्यालयात विजयी खेळाडूंचा सत्कार

### • राज्यस्तर पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत सुशांत मराठेला रौप्यपदक

प्रतिनिधी । चोपडा

**श्रीमंत छत्रपती शाहू महाराज जिल्हा क्रीडा संकुल, सातारा येथे दि.२ ते ४ फेब्रुवारीदरम्यान संपन्न झालेल्या शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ अंतर्गत राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील सुशांत युवराज मराठे या खेळाडूने सिल्वर पदक मिळविले.**



राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील १९ वर्षाआतील मुले गटात राज्यस्तरावर सुशांत मराठे या खेळाडूने उपविजेतेपद प्राप्त करून राज्यस्तरावर महाविद्यालयाची पदक मिळवण्याची परंपरा कायम राखत अभूतपूर्व यश मिळविले.

या यशस्वी खेळाडूचा संस्थेचे अध्यक्ष ॲड. संदीप सुरेश पाटील व संस्थेच्या सचिव डॉ. स्मिता संदीप पाटील यांनी पुष्पगुच्छ व ट्रॅकसुट देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.के. एन. सोनवणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी. एस. पाडवी, पर्यवेक्षक ए. एन. बोरसे, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक एस. एम. पाटील, क्रीडा संचालिका डॉ. के. एस. क्षीरसागर, क्रीडा शिक्षक अमोल ए. पाटील तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## ‘पौगंडावस्थेतील शिक्षण’ विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

### दादासाहेब डॉ.सुरेश जी.पाटील महाविद्यालयाचा उपक्रम; मान्यवरांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी । चोपडा

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव , आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा मानसशास्त्र विभाग व मानसमित्र समुपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पौगंडावस्थेतील शिक्षण या विषयावरील विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते.**



या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तसेच प्राचार्य प्रा.डॉ.के.एन.सोनवणे हे उपस्थित होते.तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून मानसशास्त्र विभाग प्रमुख, एस.पी.डी. एम.महाविद्यालय, शिरपूर येथील प्रो. डॉ. एन.एस. डोंगरे, दुसरे प्रमुख मार्गदर्शक साईबाबा मल्टीस्पेशालिटी आणि क्रिटीकल केअर सेंटर चोपडा येथील डॉ. योगिता कदम (काटे), समन्वयक डॉ. एस. ए. वाघ, कार्यशाळा समन्वयक मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. आर. पाटील आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

सदर कार्यशाळेचे आयोजन तीन सत्रांमध्ये करण्यात आले होते .पहिल्या उद्घाटन सत्रात विद्यार्थी व विद्यार्थिनींना एकत्र मार्गदर्शन करण्यात आले. उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक प्रो. डॉ. एन.एस.डोंगरे पौगंडावस्थेत होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक बदल या विषयावर मार्गदर्शन केले.

तसेच उद्घाटन सत्राचे व कार्यशाळेचे अध्यक्ष प्र.प्राचार्य डॉ.के.एन.सोनवणे यांनी पौगंडावस्थेतील शिक्षण या विषयावर बोलतांना व्यक्तीचे मन कसे कार्य करते ते कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या विविध कवितेचे दाखले देवून उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## चोपडा तालुका पोलिस पाटील अध्यक्षपदी नंदलाल बाविस्कर



प्रतिनिधी । चोपडा

**तालुका पोलीस पाटील संघाची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात वडगाव सीम येथील पोलीस पाटील नंदलाल रावसाहेब बाविस्कर यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड करण्यात आली.**

उपाध्यक्षपदी पुष्पा सुलताने पोलीस पाटील बोराजंटी यांची निवड करण्यात आली. सचिव भागवत पाटील यांना नियुक्ती देण्यात आली. पोलिस निरीक्षक महेश टाक यांनी शुभेच्छा दिल्या. जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र सोनवणे यांनी विषय मांडून बैठकीला सुरवात केली व पोलिस पाटील विटनेर यांनी अनुमोदन दिले. यावेळी तालुक्यातील सर्व पोलिस पाटील उपस्थित होते.